# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)



# NEWSLETTER

## (JANUARY-MARCH 2023)

**Prof. Prajakta B. Pimpalkar**
(Newsletter Incharge)

**Dr. D. R. Pangavhane**
(Principal)

**Smt. R. K. Dawane** (Committee Member)
**Smt. S. B. Palve** (Committee Member)

## १) दि. ७ जानेवारी, २०२३

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचा प्रेरण कार्यक्रम (Induction Programme) संपन्न

संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा शै. वर्ष २०२२-२३ चा प्रेरण कार्यक्रम (Induction Programme) दि.०७/०१/२०२३ (शनिवार) रोजी यंत्र अभियांत्रिकी विभागाच्या सेमिनार कक्षात पार पडला. या कार्यक्रमाचा उद्देश रासेयो विभागात नव्याने रुजू झालेल्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल, शिस्तीबद्दल व एकूणच रासेयो कामाबद्दल माहिती करवून देणे हा होता.



सदर कार्यक्रमासाठी दिलीप वळसे-पाटील कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा येथील प्राध्यापक व शिवव्याख्याते डॉ. शाकुराव कोरडे यांची प्रमुख अतिथी व प्रा. डॉ. दत्तात्रय चव्हाण यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लाभली होती.





कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन, तुळशी रोपट्यास जलार्पण, सरस्वती पूजन, रासेयो लक्षगीत व त्या नंतर प्रमुख पाहुण्याच्या स्वागताने झाली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून दोन्ही अतिथींचा उपस्थितांना परिचय करून दिला.






डॉ. शाकुराव कोरडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना, उद्दिष्ट्ये, विविध संधी, निस्वार्थ भाव, विविध आपत्तींच्या काळी रासेयोने राष्ट्रीय व राज्यपातळीवरील केलेली वाखाणण्याजोगी कामे यांची माहिती आपल्या बहारदार, लाघवी शैलीच्या वकृत्वाने दिली. डॉ. दत्तात्रय चव्हाण यांनी रासेयो मार्फत राबविले जाणारे विविध उपक्रम, युवकांना उपलब्ध असलेल्या संधी, रासेयो स्वयंसेवकांची शिस्त, सामाजिक व्यवहार यांची माहिती दिली.










कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी तावरे व साक्षी गलबले यांनी केले.

## २) दि. ८ जानेवारी, २०२३

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागामार्फत महाविद्यालय व परिसरातील श्वानांचे लसीकरण व उपचार

दि.०८/०१/२०२३ (रविवार) रोजी अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकाराने “Paws Care Foundation, Pune” या NGO मार्फत महाविद्यालय व आजूबाजूच्या परिसरात वावरणाऱ्या, विविध त्वचा आजारांनी त्रस्त असलेल्या भटक्या श्वानांचे लसीकरण करण्यात आले. तसेच दि. ३१/०१/२०२३ रोजीपर्यंत राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्वयंसेवकांमार्फत या श्वानांवर औषधपाणी देऊन उपचार करण्यात आले.






या सर्व लसीकरण व उपचारामुळे महाविद्यालय व आजूबाजूच्या परिसरात वावरणाऱ्या जवळपास २०-२५ भटक्या श्वानांना जीवनदान मिळाले असून त्यांच्या प्रकृतीत उत्तम सुधारणा झाली आहे.










सदर मोहीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ यांच्या मार्गदर्शनात सुहानी पोवार, हर्षल बर्डे, हेमंत सुरवसे, शंतनू शेलार, साक्षी गलबले, माधव गंभिरे, श्रुती काळे या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी पार पाडली.

### ३) दि. २१ जानेवारी, २०२३

### बांबू ट्रीटमेंट प्लाण्टला डॉ. एम जी शेख, स. प्रा. (उपयोजित यंत्रशास्त्र) आणि श्री. एस व्ही भारंबे, ता. प्र. स. यांची भेट

दिनांक २१-०१-२०२३ रोजी श्री. विनय कोलते यांच्या बांबू ट्रीटमेंट प्लाण्टला डॉ. एम जी शेख, स. प्रा. (उपयोजित यंत्रशास्त्र) आणि श्री. एस व्ही भारंबे, ता. प्र. स. यांनी भेट दिली आणि शास्वत विकासासाठी उपयुक्त असलेल्या बांबूवर कश्याप्रकारे ट्रीटमेंट केली जाते या बाबतची माहिती घेतली.





## 4) दि. २५ जानेवारी, २०२३

### “राष्ट्रीय मतदार दिवस” साजरीकरण

राष्ट्रीय मतदार दिवस (दि.२५ जानेवारी, २०२३) च्या निमित्ताने मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणुक सहभाग या कार्यक्रमांतर्गत संस्थेतील विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नावनोंदणी व मतदान करण्याविषयी तसेच लोकशाहीविषयी जागरूकता आणावी या उद्देशाने भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे या महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस (दि. २५ जानेवारी, २०२३) खालीलप्रमाणे साजरा करण्यात आला...




### १) विविध स्पर्धांचे आयोजन :

दि .२३ जानेवारी ,२०२३ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता संस्थेच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील सेमिनार कक्षात निबंध ,मीम ,वक्तृत्व ,चित्रकला , घोषवाक्य ,गाणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .यातील **निबंध स्पर्धेत कु .सौरव उचाळे ,प्रथम वर्ष , यंत्र अभियांत्रिकी याने** तर **वक्तृत्व स्पर्धेत कु .परेश फाळके , प्रथम वर्ष , स्थापत्य अभियांत्रिकी याने प्रथम क्रमांक पटकावला** .सदर विजयी स्पर्धकांची नावे व माहिती मा .जिल्हाधिकारी ,पुणे यांचेकडून प्रशस्तीपत्र प्राप्त होण्यासाठी संदर्भीय परिपत्रकात दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये २३ जानेवारी ,२०२३ रोजी दिलेल्या मुदतीत भरण्यात आली .तसेच सदर विजयी स्पर्धकांचे महाविद्यालयाचे मा .प्राचार्य डॉ .दिलीप रा .पानगव्हाणे यांनी दि.२५ जानेवारी ,२०२३ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस प्रतिज्ञेपुर्वी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



### २) राष्ट्रीय मतदार दिवस प्रतिज्ञा:

महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. दिलीप रा. पानगव्हाणे यांनी दि.२५ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता महाविद्यालयाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर एकत्रित राष्ट्रीय मतदार दिवस प्रतिज्ञा दिली. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.





### ५) दि.११ फेब्रुवारी, २०२३
### स्थापत्य विभागातील विद्यार्थ्यांचे TPO अंतर्गत Campus द्वारे निवड

Chryso Mumbai Campus drive held on 11. 2. 2023 at Gcoear Avasari for civil Engineering Student. After Online test & Interviews Abhishek B. Korde, Payal B. Khairnar, & Utkarsh V. Parale BE Civil Engg. student Place with CTC 3LPA! Dr. Sadanand Deshpande ,Dr. A.B. Patil, & Dr. M.G.Shaikh Guided the student for Campas online Test & Interview.





### ६) दि २१ फेब्रुवारी, २०२३

### संस्थेत आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा

दि २१/०२/२०२३ रोजी संस्थेत आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केला. यावेळी डॉ बोनगुलवार यांचे 'मातृभाषेतून तंत्र शिक्षणः महत्व आणि आवश्यकता' या विषयावर माहितीपूर्ण रंजक व्याख्यान झाले. पोवाड आणि कविता सादर करून प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अदिती वंजारे या विद्यार्थिनींने सूत्रसंचालन केले. मराठी भाषा अधिकारी डॉ शेख(स्थापत्य अभि. विभाग) , मराठी भाषा मंडळ अध्यक्ष प्रा काराजनगी, जिमखाना प्रमुख प्रा अकोले व इतर अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी श्रीमती सुवर्णा मोरडे यांनी विशेष प्रयत्न केले.










## ७) दि. २१ फेब्रुवारी, २०२३ ते दि. २७ फेब्रुवारी, २०२३

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर अवसरी (बुद्रुक) येथे जल्लोषात संपन्न

राष्ट्रीय सेवा योजना विभाग शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) चे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. २१/०२/२०२३ ते दि. २७/०२/२०२३ या कालावधीत मौजे अवसरी (बुद्रुक), ता. आंबेगाव जि. पुणे येथे जल्लोषात संपन्न झाले.






भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत “युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास” या संकल्पनेवर आयोजित या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये स्वच्छता, बालविवाह, अंधश्रद्धा निर्मुलन, महिला सबलीकरण, नवमतदार जनजागृती, वृक्षारोपण, जलप्रबोधन व जलसंधारण या कामावर मुख्यत्वे भर देण्यात आला. शिबिर कालावधीत श्रमदान सत्रामध्ये गावठाण, मंदिर, शाळा, स्मशानभूमी या परिसरात स्वच्छता करण्यात आली. गावातील ग्रीन अवसरीच्या माध्यमातून गावच्या ओढयावर लागवड केलेल्या नारळांच्या झाडांमध्ये साफसफाई करून झाडांना आळे करून पाणी देण्यात आले.



तसेच गावातील नाना-नानी पार्कमध्ये स्वच्छता करून तेथील झाडांनाही आळी करून पाणी देण्यात आले. या दोन्ही ठिकाणी ड्रीपची व्यवस्था सुरळीत करण्यात आली. याशिवाय, गावातील विद्या विकास मंदिर या माध्यमिक शाळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी ५ वी ते ९ वी च्या मुलांना करिअर, सॉफ्ट स्किल्स, विज्ञान, गणित या विषयांवर मार्गदर्शन केले. स्वच्छता, नवमतदार नोंदणी, बालविवाह, रक्तदान, जलसंधारण याबाबत जनजागृती करण्यात आली व शेवटच्या दिवशी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.



दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये व्याख्यानमाला व सदिच्छा भेटीच्या माध्यमातून रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर, घोडेगाव येथील बी. डी. काळे

महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. वल्लभ करंदीकर, आंबेगाव तालुक्याचे नायब तहसीलदार डॉ. सचिन वाघ, अवसरी (खुर्द) येथील शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील प्रा. नागप्पा काराजनगी, रासेयो विभाग समन्वयक प्रा. संजय पोकळे या मान्यवरांनी शिबिरार्थी स्वयंसेवकांना वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले.



सायंकाळच्या सत्रामध्ये ग्रामसर्वेक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाशी समरस होण्याकरिता शिबिरार्थी स्वयंसेवकांनी गावाची ऐतिहासिक, भौगोलिक, कौटुंबिक, शैक्षणिक, जैवविविधिय इ. माहिती जाणून घेतली.



रात्रीच्या सत्रात शाळकरी मुले, महिला, व समस्त ग्रामस्थ यांचे विविध विषयांवरील सांस्कृतिक कार्यक्रम, डिजिटायझेशन व कॅशलेस व्यवहार प्रशिक्षण, शासनाच्या विविध योजनांची माहिती, महिला सक्षमीकरण, अंधश्रद्धा व व्यसनमुक्ती निर्मुलन पथनाट्य, इ. माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. दि.२६/०२/२०२३ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे मनोरंजन व प्रबोधन करण्यात आले.

शिबीर कालावधीत महविद्यालयातील डॉ. श्याम सोनवणे, डॉ. चंद्रशेखर सेवतकर, डॉ. मिलिंद बोनगुलवार, डॉ. सुहास करमारे या प्राध्यापकांनी शिबिरास सदिच्छा भेट व मार्गदर्शन याद्वारे शिबिरार्थी स्वयंसेवकांचा उत्साह वाढविला.

शिबिराचे संपूर्ण नियोजन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.



शिबीर कालावधीत अवसरी (बुद्रुक) गावचे सरपंच श्री. पवन हिले, उपसरपंच श्रीमती शितलताई हिंगे, ग्रामविकास अधिकारी श्री. मोहन गर्जे, माजी उपसरपंच श्री. सचिन हिंगे, ग्रामपंचायत सदस्य श्री. प्रशांत वाडेकर, पोलीस पाटील श्रीमती माधुरीताई जाधव, पुणे जि. प. च्या माजी सदस्या श्रीमती रेवातीताई वाडेकर, माजी तंटामुक्ती अध्यक्ष श्री. विलास हिंगे, विद्या विकास मंदिर शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. विकास हिंगे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. उमेश शिंदे, पत्रकार श्री. जयेश शहा, मिलिंद टेमकर व प्रताप हिंगे, अवसरी बुद्रुक ग्राम स्वच्छता समितीचे श्री. अनिल हिंगे, श्री. प्रशांत हिंगे, श्री. कल्याण हिंगे, श्री. संभाजी हिंगे, विद्या विकास मंदिर शाळेचे मुख्याध्यापक श्री. अंकुश शिंगाडे, विघ्नहर हॉस्पिटलचे संचालक डॉ. विकास चव्हाण, गणेश मंडप व स्पीकर्सचे मालक श्री. महेंद्र शिंदे, कु. अंकिता व सौ. मनीषा चौरे, श्री. विनायक हिंगे, शेतकरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, अवसरी बुद्रुक, श्री. शांताराम शेटे, व मुक्ताई महिला स्वयंसहाय्यता बचतगट, अवसरी बुद्रुक व समस्त ग्रामस्थांचे शिबिरार्थी स्वयंसेवकांना विशेष सहकार्य व प्रोत्साहन लाभले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ, सहाय्यक कर्मचारी श्री. मिलिंद हांडे व श्रीमती प्रज्ञा बोराडे आणि राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी प्रशांत ढोले, अथर्व पाटील, प्रतिक पोटे, पंढरी बारले, अविष्कार गायकवाड, केदारनाथ साहू, अश्विनी राऊत, प्राची देवराम, जान्हवी देशपांडे, प्रज्ञा कुलकर्णी, ऐश्वर्या कोतकर, साक्षी तावरे, मयुरी विधाते व सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

**८) दि. २३ व २४ फेब्रुवारी, २०२३**

**"Irrigation Management: Focus on distributary and minor network" (सिंचन व्यवस्थापन) या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेत स्थापत्य विभाग सहभागी.**

दिनांक - २३ व २४ फेब्रुवारी २०२३ रोजी MIT औरंगाबाद येथे उन्नत महाराष्ट्र अभियान (UMA) CEII IIT बॉम्बे तर्फे आयोजित "Irrigation Management: Focus on distributary and minor network" (सिंचन व्यवस्थापन) या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेत शासकीय अभयांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी येथील स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

या वेळी WRD चे महासंचालक श्री. बेलसरे सर व WRD चे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते तसेच स्थापत्य अभि.विभागातील विभाग प्रमुख डॉ. डब्लू. एन. देऊळकर , प्राध्यापक डॉ. एस. बी. खरमाळे , प्राध्यापक श्री. कळमकर , व तृतीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थी कु. कुणाल गोरे, कु. अभिषेक झारगड, कु. शिवप्रसाद पाटील, कु. मुकूंद आंबटकर, कु. तुषार बोरावके ई. उपस्थितीत होते.





**९) दि. २५ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३**

**अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कु. चारुशीला शिरीष पानवळ हिचा "राष्ट्रीय एकात्मता शिबीरात" (NIC) सहभाग**

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थीनी कु. चारुशीला शिरीष पानवळ, तृतीय वर्ष, अणुविद्युत अभियांत्रिकी हिने दि. २५ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या दरम्यान बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मेसरा , पटना येथे पार पडलेल्या "राष्ट्रीय एकात्मता शिबिरात" सहभाग नोंदविला.




युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दि. २५ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या दरम्यान बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मेसरा , पटना येथे पार पडलेल्या 'राष्ट्रीय एकात्मता शिबीरा'साठी शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द) या महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. चारुशीला शिरीष पानवळ हीची

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून निवड करण्यात आली होती.






या शिबिरासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून विविध महाविद्यालयामधून १६ राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा संघ पाठवण्यात आला होता. या शिबिरामध्ये देशभरातील एकूण ९ राज्यातील २१० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये स्वयंसेवकांना व्यसनमुक्ती, रक्तदान, युवकांचा राजकारणातील सहभाग, G20, Y20 यासारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.




या ७ दिवसांच्या शिबिरामध्ये रोज संध्याकाळी होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वयंसेवकांना विविध राज्यांची संस्कृती समजून घेता आली, तसेच आपल्या राज्याची संस्कृती राष्ट्रीय पातळीवर सादर करण्याची संधी मिळाली. या शिबिरामध्ये दि. २८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते, या शिबिरामध्ये कु. चारुशीला पानवळ हीने रक्तदान करून आपला सहभाग नोंदवला. तसेच शिबिराच्या शेवटच्या दिवशी आपल्या महाराष्ट्रातील युद्धकलांमधील एक असणाऱ्या दांडपट्ट्याचं देखील प्रात्यक्षिक केलं.




सदर शिबिरात सहभागी होण्यासाठी तिला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय संचालनालय, पुणे चे संचालक डॉ. डी. कार्थीगेयन, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर, विभाग समन्वयक प्रा. संजय पोकळे यांचे प्रोत्साहन लाभले.

सदर विद्यार्थीनीस हे यश संपादन करण्यासाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ, तसेच अणुविद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. मनोज नागमोडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन प्राप्त झाले.

## १०) दि. ४ मार्च, २०२३
## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागामार्फत दुर्गसंवर्धन मोहीम संपन्न

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून “किल्ले नारायणगड” ता. जुन्नर येथे दुर्गसंवर्धन मोहीम दि. ४ मार्च, २०२३ रोजी राबविण्यात आली. सदर ‘किल्ले नारायणगड’ हा किल्ला जुन्नर तालुक्यातील नारायणगाव पासून सुमारे १० किमी अंतरावर असून समुद्र सपाटीपासून ८७६ मी. उंचीवर आहे. हा किल्ला ‘गिरीदुर्ग’ प्रकारातला आहे.




या मोहिमेत सर्वप्रथम किल्ल्यावरील आवश्यक आणि महत्त्वाच्या कामांचा आढावा घेण्यात आला व त्यानुसार स्वयंसेवकांचे गट पाडून त्यांना कामाचे वाटप करण्यात आले. यात मुख्यतः गडावरील किल्लेदार वाड्याची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. तसेच गडावरील पाण्याच्या टाक्यांचीही स्वच्छता केली. एका गटाने संपूर्ण प्लास्टिक कचरा गोळा केला. काही स्वयंसेवकांनी गडाच्या सर्वात उंच भागात असलेल्या हस्तामाता मंदिराच्या आसपासच्या भागाची स्वच्छता केली. गडावर काम करत असताना स्वयंसेवकांना काही ठिकाणी दगडांवर आक्षेपार्ह लिहलेले आढळले ते मिटवण्याचे कामही त्वरित करण्यात आले. शेवटी स्वयंसेवकांनी शिवकालीन महत्त्वाच्या घडामोडींवर चर्चा केली व पोवाडे म्हटले. सदर मोहीम रासेयो स्वयंसेवकांकडून दुर्ग संर्वधनाचे नियमांचे पालन करून सुरक्षित पार पाडण्यात आली.



सदर मोहीमेचे आयोजन विदयार्थ्यी समन्वयक प्रशांत ढोले, अक्षय काळे व सर्व रासेयो स्वयंसेवक यांनी केले. याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे व राष्ट्रीय सेव योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले.






**११) दि.०९ मार्च, २०२३ ते दि.११ मार्च, २०२३**

**अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कु. तेजस जाधव व कु. जान्हवी देशपांडे यांचा “वैभवशाली जुन्नरचे पर्यटन” या तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय विशेष शिबिरामध्ये सहभाग**

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी कु. **तेजस मच्छिंद्र जाधव व कु. जान्हवी किरण देशपांडे**, तृतीय वर्ष, उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी यांनी दि.०९ मार्च, २०२३ ते दि.११ मार्च, २०२३ या दरम्यान समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटशन्सच्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, बेल्हे, ता. जुन्नर जि. पुणे येथे पार पडलेल्या “वैभवशाली जुन्नरचे पर्यटन” या तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय विशेष शिबिरामध्ये सहभाग नोंदविला.




राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, बेल्हे तसेच जुन्नर पर्यटन विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "वैभवशाली जुन्नरचे पर्यटन" या विषयावर तीन दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते. सदर "वैभवशाली जुन्नरचे पर्यटन" या विषयावर आधारीत तीन दिवसीय विशेष शिबिरासाठी शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द) या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी कु. **तेजस जाधव व कु. जान्हवी देशपांडे**, यांची महाविद्यालायीन पातळीवर निवडकरण्यात आली होती.




या शिबिरासाठी पुणे, नगर आणि नाशिक विभागातून एकूण १७० विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये स्वयंसेवकांना जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक, भौगोलिक वास्तू व जुन्नर तालुक्यातील पर्यटन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.





वैभवशाली जुन्नरचे पर्यटन कार्यशाळा ही महाविद्यालयीन युवकांमध्ये जुन्नर पर्यटनाविषयी जाणीव जागृती निर्माण करणारी ठरली. डॉ. राधाकृष्ण गायकवाड व डॉ. लहुजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक बाबतीत वैभवशाली जुन्नरचे पर्यटन यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले. श्री. यश मस्करे यांनी जैवविविधता, खगोलीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. श्री. मनोज हाडवळे यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने आणि कुतूहलाने विचारलेल्या प्रश्नांची दिलखुलासपणे उत्तरे देत पर्यटनातून नवनवीन रोजगाराच्या संधीची माहिती दिली व मार्गदर्शन केले.



सदर विध्यार्थ्यांना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. मंगेश पांचाळ, तसेच उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. नवनाथ नेहे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

## १२) दि. ११ मार्च २०२३

## भीमाशंकर करंडक युवा महोस्तव २०२३ मध्ये स्थापत्य अभि.च्या विद्यार्थ्यांचा सहभाग

१. युवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री मा. ना. दिलीपराव वळसे पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली मंचर येथे आयोजीत भीमाशंकर करंडक युवक महोत्सव२०२३ (प्राथमिक फेरी - दिनांक ६ मार्च २०२३ ते दिनांक ९ मार्च २०२३ व महाअंतिम फेरी -दि. ११ मार्च २०२३) यामध्ये समूह नृत्य यात चौथ्या क्रमांकाचे विजेते ठरले शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी खुर्द मधील शिवप्रसाद पाटील आणि ग्रुप. या समूह नृत्य स्फर्धेत कु . शिवप्रसाद पाटील - तृतीय वर्ष स्थापत्य अभि. , कुमारी लीना नाहीरे - चतुर्थ वर्ष स्थापत्य अभि., कु.वैष्णव चौधरी- चतुर्थ वर्ष स्थापत्य अभि., कुमारी ऐश्वर्या चेमटे, कुमारी प्रगती शेंदरे व कुमारी आभा पाटील या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.




२. दि. ११ मार्च २०२३ रोजी मंचर येथे आयोजित भीमाशंकर करंडक 2023 मध्ये वैयक्तिक नृत्य यात **पाचव्या क्रमांकाची** विजेती ठरली शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी खुर्द मधील श्रुती काटे ,चतुर्थ वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी.



## १३) दि.१४ मार्च, २०२३

### शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द) येथे ZENITH: 2021-22 नियतकालिकचे प्रकाशन




शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे दि. १४/०३/२०२३, मंगळवार रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ च्या 'ZENITH' या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. सदर नियतकालिक हि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी, त्यांचे अंतर्गत ज्ञान विकसित करण्यासाठी व महाविद्यालयाच्या विविध विभागातील माहीती प्रकाशित करण्यासाठी तयार केलेली आहे.

नियतकालिक हे विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या वेबसाईट वर व तसेच महाविद्यालयीन ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

या नियतकालिकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप रा. पानगव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी नियतकालिक समितीचे समन्वयक श्रीमती प्राजक्ता भा. पिंपळकर, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व नियतकालिक समितीचे सदस्या श्रीमती पालवे, श्रीमती डवने, सर्व विद्यार्थी ऋत्विक बागले, ओम टोपले, अनुष्का सिंह, साक्षी वर्तक, मृणाल आदे, ऋतुराज आहेर उपस्थित होते.

## १४) दि. १८ मार्च २०२३

### स्वयंचल अभियांत्रिकी संघटनेच्या विद्यार्थ्यांमार्फत 'बालगृह, अनाथ, निराधार मुलांचे संगोपन केंद्र' येथे सामाजिक उपक्रमात सहभाग.

स्वयंचल अभियांत्रिकी संघटनेच्या विद्यार्थ्यांमार्फत दि. १८/०३/२०२३, शनिवार रोजी 'बालगृह, अनाथ, निराधार मुलांचे संगोपन केंद्र' मु. पळस्टीका, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. सामाजिक उपक्रमाकरिता स्वयंचल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेच्या समन्वयक श्रीमती प्राजक्ता भा. पिंपळकर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. संगोपन केंद्रामध्ये विविध वयोगटातील जवळपास ४५ विद्यार्थी उपस्थित होते.






स्वयंचल अभियांत्रिकी संघटनेच्या विद्यार्थ्यांनी तेथील विद्यार्थ्यांना अनाथाश्रमापासून सुरुवात करून सर्वांसमोर आदर्श निर्माण करणाऱ्या यशस्वी व्यक्तीबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले. १० वी १२ वी नंतर स्पर्धा परिक्षेची तयारी करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर मात, स्वच्छतेचे महत्व, सोशल मिडिया चे होणारे फायदे व तोटे याबद्दल सखोल माहिती दिली. लहान वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विविध

प्रकारच्या हस्तकलेचा उपक्रम राबविण्यात आला. स्वयंचल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेच्या समन्वयक श्रीमती प्राजक्ता भा. पिंपळकर यांनी सर्वांचे आभार मानले.

**१५) दि. २१ मार्च, २०२३**

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे टेकसक्षम (Techsaksham) प्रोजेक्टचे विभागीय प्रदर्शन (रिजनल शोकेस) संपन्न**

सैप (SAP) इंडिया आणि मायक्रोसॉफ्ट या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने CSR फंड अंतर्गत प्रायोजित केलेली Techsaksham हि कार्यशाळा एड्युनेट (edunet) फौंडेशन द्वारे देशभर राबविण्यात आली. सदर Techsaksham कार्यशाळा हि शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ऑफलाईन व ऑनलाइन या दोन्ही पद्धतीने घेण्यात आली. सदरची कार्यशाळा हि द्वितीय, तृतीय, व चतुर्थ वर्षांमधील सर्किट शाखेच्या म्हणजेच संगणक, अणुविद्युत व उपकरणीकरण अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थिनींसाठी राबविण्यात आली.



या Techsaksham कार्यशाळेअंतर्गत आर्टीफिसिअल इंटेलिजन्स, क्लाऊड कॉम्पुटिंग व वेब डिझाइन या विषयांवर देशभरातील एकूण पाच विभागात टेकसक्षम (Techsaksham) प्रोजेक्टचे विभागीय प्रदर्शन (रिजनल शोकेस) राबविण्यात येत आहे. त्यापैकी तिसरे विभागीय प्रदर्शन (रिजनल शोकेस) महाराष्ट्र विभागात शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे दि. २१ मार्च, २०२३ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या वेळे मध्ये संपन्न झाले. या विभागीय प्रदर्शनात (रिजनल शोकेस) विद्यार्थिनींनी बनवलेल्या प्रोजेक्टसचे परीक्षण करण्यात आले. यात एकूण ७० विद्यार्थिनींनी २२ प्रोजेक्टसद्वारे उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या विभागीय प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांनी, "महाराष्ट्र विभागातील विभागीय प्रदर्शन (रिजनल शोकेस) शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) या संस्थेत आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल सैप (SAP) इंडिया, मायक्रोसॉफ्ट आणि एड्युनेट(edunet) फौंडेशन या संस्थांचे आभार मानले तसेच सर्व सहभागी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या".



मायक्रोसॉफ्ट आणि एड्युनेट या कंपनीच्या प्रतिनिधी कवलप्रीत कौर व मुक्ता राऊत तसेच शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील डॉ. वंदना इनामदार, डॉ. संदीप थोरात व प्रा. किशोर सदाफळे यांनी सदर रिजनल शोकेसचे परीक्षक म्हणून काम पाहिले.



या कार्यक्रमाचा समारोप मायक्रोसॉफ्ट आणि एड्युनेट या कंपनीच्या प्रतिनिधी कवलप्रीत कौर व मुक्ता राऊत यांच्या हस्ते संस्थेत वृक्षारोपण करून झाला. सदर कार्यशाळा व विभागीय प्रदर्शनासाठी प्रा. रामदास बागवडे यांनी नोडल अधिकारी (SPOC) म्हणून काम पहिले. सदर कार्यशाळा प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे, संस्थेतील प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी डॉ. सदानंद देशपांडे व संगणक विभाग प्रमुख डॉ. शशिकांत घुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



**दि. २४ मार्च, २०२३**

***E& TC Dept. Student Activities, Achievements and students participation***

1. E& TC Dept. students got 1st Rank in National level project Competition (Technophilia-23).

**Title of Project** - Multipurpose Surveillance Robot.

6th National level Project Competition, Organized by - MIT Academy of engineering college, Alandi, on 24 March 2023.

Following students Participated from BE E&Tc

1)Sanket Madhav Mendke.

2) Sahil Madhukar Dhage.

3)Pooja Suresh Shinde.

4) Shraddha Ramakant Londhe.

Guided by: Dr N P Futane from E&Tc Dept.






२) Unnati Kulkarni (passout in Academic year 2021) got admission to MS program in University of California IRVINE.

३) Samiksha Patil (pass out in Academic year 2022) got admission to MS program in University of Colorado Boulder.

४) Charushila Shirish Panwal from TE(E&Tc) selected by SPPU, Pune for National Integration Camp at Birla Institute of Technology, Patna, Bihar.